महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०५ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### बिनविरोध निवडणुका...

## लोकशाहीचा विजय की घसरण?

लोकशाही व्यवस्थेचा आत्मा म्हणजे निवडणूक. मतदारांचा सक्रिय सहभाग, स्पर्धात्मक उमेदवारी आणि विचारांची टक्कर यातूनच लोकशाही अधिक सशक्त होत असते. मात्र अलीकडच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते सहकारी संस्था, ग्रामपंचायती, बाजार समित्या आणि अगदी काही विधानपरिषदेच्या जागांपर्यंत बिनविरोध निवडणुकांचे प्रमाण वाढताना दिसते. हा बदल स्वागतार्ह आहे की चिंताजनक—हा प्रश्न आता गांभीर्याने विचारात घेण्याची वेळ आली आहे.

**■ बिनविरोधतेमागील कारणे**

बिनविरोध निवडणुका होण्यामागे अनेक कारणे असतात. कधी राजकीय सहमती, कधी सामाजिक दबाव, कधी आर्थिक भीती, तर कधी विरोधकांना नामांकनापासूनच रोखण्याचे डावपेच. विशेषतः ग्रामीण भागात "समंजस्य" या नावाखाली स्पर्धेला आळा घातला जातो. सत्ताधारी गटाचा दबाव, हिंसेची किंवा खटल्यांची भीती, खर्चिक निवडणुकीपासून दूर राहण्याची मानसिकता—ही सर्व कारणे बिनविरोधतेला खतपाणी घालतात.

**■ लोकशाहीवर होणारा परिणाम**

बिनविरोध निवडणूक म्हणजे मतदारांचा अधिकार आपोआपच हिरावला जाणे. मत न देता प्रतिनिधी निवडला जाणे ही लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत बाब आहे. स्पर्धा नसेल तर उत्तरदायित्व कमी होते, आणि सत्तेचा अहंकार वाढण्याचा धोका निर्माण होतो. निवडून आलेला प्रतिनिधी "लोकांनी निवडलेला" नसून "परिस्थितीने बसवलेला" ठरतो, अशी भावना निर्माण होऊ शकते.

**■ सकारात्मक बाजूही आहे का?**

काही वेळा बिनविरोध निवडणुका सामाजिक सलोखा, खर्चाची बचत आणि राजकीय शांतता यांचे प्रतीक ठरू शकतात. मतभेद टाळून विकासावर एकत्र काम करण्याचा हेतू असेल, तर बिनविरोधतेकडे सकारात्मक दृष्टीने पाहता येईल. मात्र ही बिनविरोधता स्वेच्छेने आणि दबावमुक्त असणे आवश्यक आहे.

**■ पारदर्शकतेची गरज**

खरी लोकशाही टिकवायची असेल तर बिनविरोध निवडणुका अपवाद असाव्यात, नियम नव्हे. निवडणूक आयोगाने, प्रशासनाने आणि समाजानेही याकडे सजगपणे पाहणे गरजेचे आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यामागील कारणांची पारदर्शक चौकशी, भयमुक्त वातावरण आणि मतदारांचे प्रबोधन—या उपायांशिवाय लोकशाहीची मुळे कमकुवत होतील.

**■ निष्कर्ष**

बिनविरोध निवडणुका हा लोकशाहीचा सोपा मार्ग नसून धोक्याचा वळणमार्ग ठरू शकतो. लोकशाही टिकवायची असेल तर निवडणूक लढवण्याचा आणि मत देण्याचा अधिकार अबाधित ठेवणे अत्यावश्यक आहे. स्पर्धा, प्रश्न, चर्चा आणि निर्णय—यातूनच लोकशाही मजबूत होते, बिनविरोध शांततेत नव्हे. लोकशाही म्हणजे केवळ निकाल नाही, तर प्रक्रिया आहे—आणि त्या प्रक्रियेला बायपास करणारी बिनविरोधता काळजीची घंटा ठरू शकते.

# 'मुंबईसाठी ठाकरे बंधूंचा शिवशक्तीचा वचननामा'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : मुंबई महापालिका निवडणुकीसाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा वचननामा प्रसिध्द करण्यात आला. स्वतः उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी शिवसेना भवनात एकत्रित येत 'मुंबईसाठी शिवशक्तीचा वचननामा' मांडला. 'ठाकरेंचा शब्द' अशी टॅगलाईन असलेल्या या वचननाम्यामध्ये अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. ठाकरे बंधूनी वचननामा प्रसिध्द केल्यानंतर काही मिनिटांतच त्यावर मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी 'आरोपपत्रा'च्या माध्यमातून




प्रहार केले. त्यानंतर एकापाठोपाठ एक माजी खासदार राहुल शेवाळे आणि मंत्री आशिष शेलार यांनीही वचननाम्यावरून ठाकरे बंधूंना घेरले. आरोपांची फैरी झडत असतानाच वकील गुणरत्न सदावर्ते यांनी कायदेशीर मुद्दा पुढे करत थेट वचननाम्यावरच आक्षेप घेतला.

**शिवशक्तीचा वचननामा म्हणजे मराठी माणसाच्या, मुंबईकरांच्या भल्याचा विचार! हाच विचार घेऊन वचननाम्याच्या माध्यमातून 'ठाकरेंनी' मराठी माणसाला पुन्हा एकदा आज शब्द दिलाय, आम्ही पुन्हा करून दाखवणारच! भविष्यात मुंबईला विकासाच्या पथावर नेण्यासाठी, जागतिक स्तरावर मुंबईचं महत्त्व टिकवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास देखील ठाकरे बंधूनी यावेळी व्यक्त केला.**

### ■ हा वचननामा नव्हे तर अपचननामा - मंत्री आशिष शेलार
### ठाकरेंच्या वचननाम्याचा भाजपाकडून समाचार

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांची शिवसेना व राज ठाकरे यांच्या मनसेचे राज ठाकरे यांनी रविवारी जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यावर सत्ताधारी भाजपकडून जोरदार टीका केली आहे. या जाहीरनाम्यावर टीका करताना भाजप नेते व मंत्री आशिष शेलार म्हणाले, प्रसिद्ध केलेला हा वचननामा नव्हे तर अपचननामा आहे, अशा शब्दांत हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांची शिवसेना, राज ठाकरे यांची मनसे व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या संयुक्त जाहीरनाम्याचे प्रकाशन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते शिवसेनाभवन येथे करण्यात आले. 'शिवशक्तीचा वचननामा, ठाकरेंचा शब्द' अशी त्यांच्या जाहीरनाम्याची टॅगलाईन आहे. या वचननाम्यावर पत्रकार परिषद घेऊन मंत्री आशिष शेलार यांनी जोरदार टीका केली आहे. आशिष शेलार म्हणाले, ठाकरे बंधूनी या वचननाम्यातून केवळ मोठमोठे आश्वासन दिले आहेत. मात्र, हे आश्वासन नागरिकांच्या पचनी पडण्यासारखे नाही आहेत. त्यामुळे हे ऐकल्यानंतर नागरिकांना अपचन होण्यास सुरवात होते. त्यामुळे हा ठाकरे बंधूनी प्रसिद्ध केलेला हा वचननामा नव्हे तर अपचननामा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मुंबई भाजपचे प्रदेशाध्यक्ष अमित साटम यांनी देखील ठाकरे बंधूंच्या जाहीरनाम्यावर सडकवून टीका केली. त्यांचा महापौर झाला तर महाराष्ट्रचा पाकिस्तान होईल. राज ठाकरे यांचे कार्यकर्ते ज्या प्रमाणे मारामारी करतात, त्यामुळे संस्कृती खालावत आहे. मुंबईकरांचा निर्णय पक्का आहे. येणाऱ्या निवडणुकीत भगवा फडकणार असून महायुतीचा महापौर बसणार आहे. पुढील वर्षी गणपतीला हे दिसणार नाहीत, दिवाळीला एकत्र दिसणार नाहीत. मराठी माणसासाठी 25 वर्षात उद्धव मामुने केलेले एक तर काम दाखवावे, आम्ही 10 काम दाखवतो. बीडीडी चाळीत आम्ही लोकांना घर दिले. तुम्ही मातोश्री दोन बनवले, अशी टीका साटम यांनी केली.

## उमेदवारी मागे घेणाऱ्यांविरोधात ठाकरे गट आणि मनसे आक्रमक
### गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिसांना निवेदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे पालिका निवडणुकीत मतदानापूर्वीच शिंदे गटाचे उमेदवार बिनविरोध झाले असून मनसे, ठाकरे गट आघाडीच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानंतर संतापलेल्या ठाकरे गटाचे नेते राजन विचारे आणि मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन दिले आहे. त्यामुळे संबंधित माघार घेणाऱ्या उमेदवारांविरोधात कायदेशीर कारवाईसाठी आता ठाकरे बंधूचे पक्ष आक्रमक झाल्याचे दिसते. ठाण्यात शिंदे गटाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यातील मनसे आणि ठाकरे गटाच्या आघाडीच्या उमेदवारांनी अचानक अर्ज मागे घेतल्याने तीन प्रभागात शिंदे गटाचे



उमेदवार बिनविरोध आले आहेत. तर उर्वरित तीन ठिकाणी अपक्ष आणि इतर आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज बाद झाले. बिनविरोध निवडीनंतर ठाकरे गट आणि मनसे आक्रमक झाले आहेत. ठाणे महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेत शिंदेंच्या साथिदारांना 'बिनविरोध' निवडून येण्यास साह्य करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तिन्ही उमेदवारांसह संबंधित पोलीसावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी शिवसेनेचे राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी श्रीनगर पोलीसांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावर पोलिसांनी निवडणुक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासित करण्यात आले. दरम्यान, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनाही यासंदर्भात अवगत करून तातडीची कारवाई करण्याची विनंती केल्याचेही विचारे व जाधव यांनी सांगितले.

ठाणे महापालिका निवडणुकी दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने प्रभाग क्रमांक ५ 'ब' दादाभाऊ रेपाळे, प्रभाग क्रमांक १८ 'ब' च्या स्नेहा नांगरे आणि प्रभाग क्रमांक १८ 'ड' चे उमेदवार विक्रांत घाग ह्यांना पक्षातर्फे 'एबी फॉर्म देऊन अधिकृत उमेदवारी घोषित केली होती. मात्र, तिघांनीही पक्षाला न कळविता परस्पर माघार घेत शिंदेच्या साथीदारांना बिनविरोध निवडून येण्यास मदत केली. ही बाब राजन विचारे आणि अविनाश जाधव यांनी गांभिर्याने घेतली आहे. या अनुषंगाने रविवारी श्रीनगर पोलीस ठाण्यात या तिघा उमेदवारांविरोधात सेना - मनसेने निवेदन सादर करून तिघांवरही गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

## भिवंडीत निजामपूरात काँग्रेसचे हायजॅक ?
### समाजवादीच्या उमेदवारांची काँग्रेसमध्ये घुसखोरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी)** : भिवंडी शहर महानगर पालिकेच्या येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने ६० उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेसने उभे केलेले बहुतेक उमेदवार सपाचे आमदार रईस शेख यांच्या पाठिंब्यावर अवलंबून आहेत. समाजवादी पार्टीचे आमदार शेख यांनी भिवंडीत काँग्रेस पक्षाला हायजॅक करण्यात कोणतीही कसर सोडली नाही त्यामुळे काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हतबल झाले आहेत. काँग्रेस उमेदवार आणि सपाचे आमदार यांच्यात कोण बाजी मारणार? ही चर्चा शहरातील चौकाचौकात आणि चहा-पानाच्या हॉटेल, टपरी व दुकानांमध्ये रंगली आहे.

येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने जोरदार तयारी सुरु केली होती मात्र समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांचे समाजवादी पक्षात वादविवाद झाल्याने त्यांनी थेट काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काही वरिष्ठ नेत्यां सोबत गुपचूप संगनमत करून आ. रईस शेख यांनी समाजवादी पक्षाने तिकीट न दिलेल्या उमेदवारांना काँग्रेसची तिकिटे मिळवून दिली. त्यामुळे काँग्रेस व समाजवादी पक्षात मोठी खळबळ माजली असुन राजकीय उलथापालथ होऊन शहरातील राजकीय पटलावर वेगळे चित्र निर्माण झाले आहे. राष्ट्रीय मान्यता प्राप्त असलेल्या काँग्रेस पक्षातील वरिष्ठ व समाजवादी पक्षाचे आमदाराने केलेल्या या विचित्र प्रकारामुळे भिवंडीतील जुन्याजाणत्या काँग्रेस पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्तेना आणि लोकप्रतिनिधीना व भाजपा, शिवसेना गटाला सुद्धा जोरदार आश्चर्यांचा धक्का बसला आहे.

काँग्रेस पक्षाने जाहीर केलेल्या यादीतील सुमारे ३५ ते ४० समाजवादी पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी सपाचे आमदार रईस शेख लॉबिंगमध्ये व्यस्त आहेत. तर भिवंडी काँग्रेस अध्यक्ष रशीद ताहिर मोमीन काँग्रेसने तिकीट दिलेल्या उमेदवारांसाठी देखील लॉबिंग करत आहेत आणि ते काँग्रेसच्या विजयासाठी प्रयत्न करीत आहेत. या बाबत स्थानिक लोकांचे म्हणणे आहे की, सपाचे आमदार काँग्रेस उमेदवारांचा विजय निश्चित करण्यासाठी मतदारांना एकत्र करत आहेत. विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या समाजवादीचे आमदार रईस शेख यांनी उचललेल्या या धाडसी पावलांमुळे सपा कार्यकर्त्यांमध्ये खळबळ माजली असून या बाबत कारवाई करण्यासाठी समाजवादी पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये बैठका व चर्चा सुरु झाल्या आहे.

## भाजपच्या अधिकृत उमेदवाराची माघार
### संदीप गायकरांसाठी भाजप उमेदवार डॉ. उपाध्याय यांची स्वेच्छा माघार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - कल्याण पश्चिमेतील पॅनल क्रमांक ७ ड मध्ये भाजपच्या डॉ. प्रमोद उपाध्याय यांना भाजपने एबी अर्ज देऊन अधिकृत उमेदवारी जाहीर केली होती. परंतु, आपल्या प्रभागात भाजपचे माजी नगरसेवक संदीप गायकर हे उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढवित आहेत. तेच पक्षाचे अधिकृत उमेदवार आणि प्रभागातील प्रबळ दावेदार असल्याचे मत व्यक्त करून भाजपचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रमोद उपाध्याय यांनी माजी नगरसेवक संदीप गायकर यांच्यासाठी आपला उमेदवारी अर्ज प्रभाग क्रमांक सात ड मधून मागे



घेतला आहे. संदीप गायकर यांना आपले समर्थन जाहीर केले आहे. पालिका निवडणुकांमध्ये एकीकडे स्वतःलाच उमेदवारी मिळावी म्हणून पक्ष नेते, पदाधिकाऱ्यांना वेठीस धरण्याचे अनेक प्रकार गेल्या काही दिवसांमध्ये घडले. एबी अर्जाच्या नक्कल प्रती जोडून पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज भरले. असे प्रकार सुरू असताना कल्याणमध्ये भाजपमध्ये पक्षाच्या माजी नगरसेवकासाठी अधिकृत उमेदवाराने स्वतःहून आपल्या उमेदवारी मागे घेतल्याचे पहिलेच उदाहरण समोर आले आहे. कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक सात ड मध्ये घडलेली ही घटना राज्यातील पहिलीच घटना आहे, असा दावा भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

**भाजपचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रमोद उपाध्याय यांनी पक्षनिष्ठेचा अनोखा आदर्श ठेवत आपली उमेदवारी मागे घेतली आहे. माजी नगरसेवक संदीप गायकर हेच प्रभागातील प्रबळ व अधिकृत दावेदार असल्याचे मत व्यक्त करत उपाध्याय यांनी गायकर यांना जाहीर समर्थन दिले. कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक ७-ड मध्ये भाजपमध्ये दुर्मीळ ठरणारी राजकीय घटना घडली आहे. भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून एबी अर्ज मिळाल्यानंतरही डॉ. प्रमोद उपाध्याय यांनी आपली उमेदवारी स्वेच्छेने मागे घेतली आहे.**

## महत्वाचे




### शहापुरात बिबट्याची दहशत कायम ! हल्ल्यात गाईचा मृत्यू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोळखांब** : शहापुरातील डोळखांब विभागात बिबट्याची दहशत कायम आहे. परिसरातील गुंडे-डेहणे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे पाचघर - रसाळपाडा मठाजवळ दि. २ जानेवारी रोजी रात्री रसाळपाडा येथील शेतकरी भाऊ गोडांबे यांची गाय चरत असतांना तिच्यावर बिबट्याने हल्ला केल्याने गायीचा मृत्यू झाला आहे. दि. ३ रोजी वनपाल देसले व त्यांचे टीमने मृत गायीचा घटनास्थळी पंचनामा केला असुन नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. शहापुर तालुक्यात अंदाजे पंधरा ते सोळा बिबट्यांची नोंद असुन सर्वात जास्त बिबटे डोळखांब परिसरात आढळून आले आहेत. यापैकी घाटघर जलविद्युत प्रकल्प चोंढे, तसेच आजोबा देवस्थान, बंजारा व्हील (कथोरे पाडा), बेलवली, गुंडे, वाशाळा, कोठारे, साठगाब परिसर मिळुन अंदाजे नऊ ते दहा बिबट्यांची नोंद आहे. तर घाटावर उसतोड झाली कि घाटघर, कसारा, मुरबाड मागनि बिबटे शहापुरात दाखल होतात. तर पुणे जुन्नर येथील रेस्क्यू कॅपमधुन काही बिबट्यांची सवय बदलुन त्यांना शहापुरात सोडल्याची देखील चर्चा आहे.

## केडीएमसीतील बिनविरोध निवडीवर आक्षेप
### सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकरांनी ठोठावले उच्च न्यायालयाचे दार

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीच्या २० उमेदवारांना बिनविरोध विजयी घोषित करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर 'नोटा' (NOTA) पर्याय नाकारल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी राज्य निवडणूक आयोग व केडीएमसी प्रशासनाला नोटीस बजावली असून, याप्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेण्याचा इशारा दिला आहे.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर काही प्रभागांमध्ये महायुतीच्या उमेदवारांविरोधात कोणताही प्रतिस्पर्धी उमेदवार नसल्याने २० उमेदवारांचा बिनविरोध विजय झाल्याचे भाजप व शिवसेनेच्या अधिकृत नेत्यांनी जाहीर केले. यानंतर संबंधित उमेदवारांनी आपल्या मतदारसंघात विजय रॅली काढत जल्लोषही साजरा केला.

मात्र या बिनविरोध घोषणांनंतर प्रशासनात संभ्रमाचे वातावरण निर्माण




झाले आहे. कारण ईव्हीएम मशिनवर 'नोटा' हा पर्याय उपलब्ध असून, पॅनल पद्धतीच्या निवडणुकीत अशा परिस्थितीत मतदान घ्यायचे की नाही, याबाबत कोणतीही स्पष्ट दिशा नसल्याचे चित्र आहे. एका उमेदवारासाठी स्वतंत्र ईव्हीएम मशिन लावायची की नाही, यावरही प्रशासन निर्णय घेऊ शकलेले नाही.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी आक्रमक भूमिका घेत राज्य निवडणूक आयुक्त, संबंधित निवडणूक अधिकारी तसेच केडीएमसी आयुक्त यांच्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. मतदारांचा 'नोटा'चा अधिकार डावलला जात असल्याचा आरोप करत, बिनविरोध विजयी उमेदवारांसाठीही नोटा मतदान घ्यावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



# वाचक मनोगत

## आश्वासनांचे राजकारण

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ही केवळ सत्ताबदलापुरती मर्यादित नसून, शहराच्या भवितव्याची दिशा ठरवणारी ठरणार आहे. वाढती लोकसंख्या, अनियंत्रित नागरीकरण, अपुरी पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील संथगती यामुळे कल्याण-डोंबिवलीतील नागरिक अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत ही निवडणूक महत्त्वाची ठरते.

पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज, अनधिकृत बांधकामे आणि पर्यावरणाचा ऱ्हास या समस्या आजही कायम आहेत. निवडणुका आल्या की आश्वासनांची खैरात केली जाते; मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत. त्यामुळे यावेळी मतदारांनी भावनिक नव्हे तर विवेकी निर्णय घेणे आवश्यक आहे. निवडणूक जशी जवळ येते, तसतसे शहरभर आश्वासनांचे फलक उभे राहतात आणि विकासाचा पाऊस पडणार असल्याचे चित्र रंगवले जाते. मात्र हे फलक म्हणजे निव्वळ डोळ्यांत धूळफेक करण्याचे साधन ठरत आहेत. पाणी, रस्ते, कचरा, वाहतूक यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर वर्षानुवर्षे अपयशी ठरलेलेच चेहरे पुन्हा नव्या घोषणांसह समोर येतात. निवडणूक संपताच हेच लोकप्रतिनिधी गायब होतात आणि आश्वासने फलकांसह कचऱ्यात फेकली जातात. नागरिकांच्या समस्या केवळ निवडणूक काळात आठवतात, ही लोकशाहीची शोकांतिका आहे. अशा पोकळ आश्वासनांना बळी न पडता, यावेळी मतदारांनी प्रश्न विचारले पाहिजेत आणि कामाचा हिशेब मागितला पाहिजे; अन्यथा पुढील पाच वर्षे ही केवळ पश्चात्तापाची ठरतील. राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी केवळ आरोप-प्रत्यारोपांमध्ये अडकून न राहता, शहर विकासाचा स्पष्ट आराखडा मांडणे गरजेचे आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली केवळ फलकबाजी न करता, प्रत्यक्ष सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. पारदर्शक कारभार, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि वेळेत निर्णय घेणारी सक्षम महापालिका हीच आजची गरज आहे.

दुसरीकडे, नागरिकांचीही जबाबदारी तितकीच मोठी आहे. मतदान हा केवळ हक्क नसून तो शहराच्या भविष्यासाठीचा निर्णय आहे. पैशाच्या, दबावाच्या किंवा जात-धर्माच्या आधारे मतदान न करता, काम करणाऱ्या आणि काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनाच संधी दिली पाहिजे.

कल्याण-डोंबिवली ही केवळ झोपडपट्ट्या किंवा काँक्रीटचे जंगल नसून, ती लाखो नागरिकांची आशा आहे. या निवडणुकीतून सक्षम, जबाबदार आणि लोकाभिमुख नेतृत्व निवडले गेले, तरच शहराचा सर्वांगीण विकास शक्य आहे. अन्यथा ही निवडणूकही मागील अनेक निवडणुकांसारखी केवळ सत्ता संघर्षापुरतीच मर्यादित राहील.

निवडणूक आली की शहरभर विकासाची स्वप्ने दाखवणारे आश्वासनांचे फलक झळकू लागतात. रस्ते, पाणी, स्वच्छता, वाहतूक, शिक्षण अशा प्रत्येक मूलभूत प्रश्नावर मोठमोठी आश्वासने दिली जातात. मात्र ही आश्वासने फलकांपुरतीच मर्यादित राहतात, हे वास्तव नागरिकांनी अनेकदा अनुभवले आहे. निवडणूक संपताच हे फलक उतरवले जातात आणि त्यांच्यासोबतच दिलेली आश्वासनेही विस्मरणात जातात. पुढील निवडणूक येईपर्यंत समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते आणि नागरिकांना पुन्हा त्याच प्रश्नांशी झुंज द्यावी लागते. त्यामुळे यावेळी मतदारांनी केवळ फलकांवरील घोषणांवर विश्वास न ठेवता, प्रत्यक्ष कामाचा लेखाजोखा मागण्याची वेळ आली आहे.

या सगळ्या गोंगाटामागे एकच उद्देश दिसतो—मत मिळवणे. निवडणूक संपली की हेच प्रश्न पुन्हा दुर्लक्षित होतात, आणि नागरिकांच्या वाट्याला येते ती केवळ निराशा. त्यामुळे ही निवडणूक केवळ मतदारसंख्या नव्हे, तर लोकप्रतिनिधींच्या प्रामाणिकतेची कसोटी ठरणार आहे.

**दिलिप पानपाटील**
**नेतिवली, कल्याण**

# शेलारपाडा जिल्हा परिषद शाळेच्या 'रयतेचा राजा' नाटकाला प्रथम क्रमांक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये पंचायत समिती अंबरनाथ अंतर्गत झालेल्या शालेय नाट्यस्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेलारपाडा येथील विद्यार्थ्यांनी 'रयतेचा राजा' या नाटकाद्वारे प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे या विद्यार्थ्यांना आता जिल्हास्तरावर आपले नाट्य सादर करण्याची संधी मिळाली आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या नाटकातून स्वराज्यावर आलेल्या संकटांना शिवरायांनी कशा प्रकारे सामोरे जाऊन त्यावर मात केली, याचे थरारक सादरीकरण करण्यात आले. प्रभावी अभिनय, संवादफेक आणि प्रसंगरचना यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षकांसह उपस्थितांची मने जिंकली. या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवर्ग, पालक आणि ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# चिपी विमानतळावर नाईट लँडिंगला हिरवा कंदील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं दिवस-रात्र सार्वकालीन हवामानात विमान चालनाकरता परवानगी दिली आहे, यामुळे आता या विमानतळावरुन नाईट लँडिंगसह सर्व मोसमात विमान प्रवास करणं शक्य होणार आहे. याशिवाय विमानतळावरची पार्किंगची क्षमताही ३ वरून ६ विमानांपर्यंत म्हणजे दुप्पट केल्यानं विमानतळाची कार्यक्षमता दुप्पट झाली आहे. आता रात्रीही विमाने उतरू-उडू शकणार, त्यामुळे वेळापत्रक अधिक लवचिक होईल. पर्यटनाला मोठी चालना कोकण, मालवण, तारकर्ली यांसारख्या पर्यटनस्थळांना देशभरातून अधिक पर्यटक येतील.

# विजयी उमेदवारांची यादी जाहीर करणाऱ्या पक्षांवर कारवाई करा

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत तब्बल २० उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे चित्र असताना, निवडणूक कार्यालयाकडून अधिकृत निकाल जाहीर होण्यापूर्वीच काही राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी स्वतःला विजयी घोषित करून याद्या प्रसिद्ध केल्याने निवडणूक आचारसंहितेचा भंग झाला असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी केला आहे. यासंदर्भात दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केडीएमसी आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून, त्यासाठी विविध राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. मात्र काही प्रभागांमध्ये आर्थिक व राजकीय दबावामुळे काही उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा आरोप साळवी यांनी केला आहे. काही उमेदवारांवर दबावतंत्र वापरण्यात आले असले तरी त्यांनी माघार घेतलेली नाही, तर ते निवडणूक लढवत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

काही प्रभागांमध्ये प्रतिस्पर्धी उमेदवार नसल्याने संबंधित उमेदवारांनी स्वतःला विजयी घोषित करत आनंदोत्सव साजरा केला. इतकेच नव्हे, तर संबंधित राजकीय पक्षांनी आपल्या लेटरहेडवरून विजयी उमेदवारांच्या याद्याही जाहीर केल्या. मात्र निवडणूक कार्यालयाकडून अद्याप कोणालाही विजयी घोषित करण्यात आलेले नाही, तसेच कोणतेही अधिकृत पत्र किंवा प्रमाणपत्र देण्यात आलेले नसल्याचे साळवी यांनी स्पष्ट केले.

निवडणूक कार्यालयाकडून अधिकृत निकाल जाहीर होण्यापूर्वीच विजय घोषित करणे हे निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन असून, यामुळे इतर प्रभागांतील उमेदवार व मतदारांवर परिणाम होऊ शकतो. अशा प्रकारे चुकीच्या पद्धतीने वातावरण निर्मिती करून मतदानावर प्रभाव टाकणे अन्यायकारक असल्याचे साळवी यांनी म्हटले आहे.

संविधानाने प्रदान केलेल्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप करणाऱ्या आणि निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेला बाधा निर्माण करणाऱ्या संबंधित पक्ष व उमेदवारांवर कठोर कारवाई करून, आचारसंहिता भंग करणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी केली आहे.

# सासूने रचला सुनेच्या हत्येचा कट

- पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी दाखल केली बेपत्ता सुनेची तक्रार
- पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह वालधुनी पुलाखाली ठेवला लपवून

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** एका सासूने तिच्या जोडीदारासह तिच्या नातवाची नोकरी आणि पैसे मिळवण्यासाठी तिच्या सुनेची हत्या केली आणि वालधुनी पुलाखाली मृतदेह लपवून ठेवला. ही घटना कल्याण पूर्वेतील कर्पेवाडी येथील न्यू जिमीबाग येथे घडली. शनिवारी हत्येचा खुलासा करताना कल्याणचे एसीपी कल्याणजी घाटे म्हणाले की, लताबाई नाथा गांगुर्डे (६०) नावाच्या महिलेने तिचा जोडीदार जगदीश महादेव म्हात्रे यांच्यासोबत मिळून १ जानेवारीच्या रात्री तिची सून रूपाली विलास गांगुर्डे (३५) हिची लोखंडी रॉडने हत्या केली. त्यांनी पोलिसांना दिशाभूल करण्यासाठी खोटा बेपत्ता व्यक्तीचा अहवाल दाखल केला. पोलिसांनी तिला बेवारस मृतदेहाचा फोटो दाखवला तेव्हा लताबाईंनी तिच्या सुनेला ओळखले. महात्मा फुले पोलिसांनी या हत्येचा तपास केला असता, पैशासाठी आणि सरकारी नोकरीसाठी सुनेची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा समोर आला.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, रुपालीचा पती विलास गांगुर्डे रेल्वेत काम करत होता. सप्टेंबर २०२५ मध्ये त्याचे निधन झाले. पतीच्या मृत्यूनंतर, रूपालीला अंदाजे १० लाख रुपये वारसा मिळाले. सासू लताबाई यांचे लक्ष या पैशावर होते. विलासच्या जागी अनुकंपा तत्त्वावर तिचा नातू वंश याला रेल्वेत नोकरी मिळवून द्यायची होती. तथापि, रूपालीने अल्पवयीन असल्याने तिने स्वतः नोकरीसाठी अर्ज केला. यामुळे संतप्त झालेल्या सासूने तिच्या सुनेचा खून करण्याचा कट रचला आणि तिच्या साथीदारासह १ जानेवारीच्या रात्री तिची हत्या केली. पोलिसांनी सध्या लताबाई आणि तिचा साथीदार जगदीश म्हात्रे यांना खुनाच्या आरोपाखाली अटक केली आहे आणि पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.



# ह.भ.प.रामकृष्ण महाराज मोकल यांना राज्यस्तरीय कुलाबा जीवनगौरव पुरस्कार

## अध्यात्म प्रबोधन क्षेत्रातील दीर्घकालीन कीर्तनसेवेची दखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** अखिल भारतीय वारकरी मंडळ रायगड जिल्हा अध्यक्ष, रायगड भूषण पुरस्कार प्राप्त,समाज प्रबोधनकार, ह. भ. प. रामकृष्ण महाराज मोकल यांना अलिबाग येथे 3 जानेवारी रोजी झालेल्या संमेलनामध्ये कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी आमदार भाई जयंत पाटील आमदार भाई जगताप खासदार बाळया मामा तथा सुरेश म्हात्रे तसेच अध्यक्ष ॲडव्होकेट उमेश ठाकूर ,अडव्होकेट प्रवीण ठाकूर. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व इतर मान्यवर उपस्थित होते.

गेली 25 ते 30 वर्ष रामकृष्ण महाराज मोकल समाजामध्ये व्यसनाधीनता नष्ट करण्यासाठी तरुणाई मध्ये समाज प्रबोधन करतार. प्रवचन, कीर्तन, हरिपाठ, भजनाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करून ज्ञानामृत देऊन अनेक समाज बांधवांनी माळ घालून माळकरी झालेले आहेत. तसेच पायी दिंडी आळंदी अनेक वर्षांपासून चालू करून हजारो लोकांना एक चांगलं वळण तथा परमार्थाला लावण्याचा काम केलेले पहावयास मिळते. महाराज महाराष्ट्र , कर्नाटक, पंजाब अयोध्या, काशी, तिरुपती आदी ठिकाणी कीर्तनाच्या माध्यमातून तसेच प्रबोधनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, स्त्रीभ्रूणहत्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवव्याख्यान सांगून समाजामध्ये जनजागृती करण्याचं चांगलं काम करत आहेत. अशा भक्ती भाव वाल्यांनी भक्ती मार्गाने काम करून समाजाला उत्तम ज्ञानामृत देणाऱ्या कीर्तनकारांना कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले, त्यामुळे समाजामध्ये महाराजांचे स्थान आणखी उंचावलं आहे. सर्व भागांतून अभिनंदन होत आहे.

# आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नातून नडगावाला मिळाले सिमेंट काँक्रिटचे रस्ते

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण तालुक्यातील मुरबाड मतदारसंघात समाविष्ट असलेल्या नडगाव गावात आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नातून सिमेंट काँक्रिट रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून, त्यामुळे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. नडगाव गावातील विविध अंतर्गत रस्त्यांसाठी आमदार किसन कथोरे यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाला. त्यानुसार सुनिल लोणे यांच्या घरापासून कै. शंकर महाराज ते गावातील बोरणीपर्यंतचा रस्ता, वाडी ते बबन लोणे यांच्या शेतापर्यंतचा



रस्ता, भानुशाली बंगला ते खडवली-फळेगाव रस्त्यापर्यंतचा रस्ता, पिंताबरे गाव-कुंभार पाडा रस्ता तसेच अशोक गुप्ता नगर येथील रस्त्यांची सिमेंट काँक्रिट कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या रस्त्यांमुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी मोठी सोय होणार आहे. भाजीपाला, शेळीपालन, पोल्ट्री फार्म तसेच अन्य शेतीपूरक व्यवसायातील माल वाहतूक सुलभ होणार आहे. यासोबतच पावसाळ्यात भातशेतीची पेरणी, नांगरणीसाठी ट्रॅक्टर, पावर टिलर व अन्य शेतीसाठी लागणारी वाहने ने-आण करणेही सोपे होणार आहे.

> "या रस्त्यांमुळे शेतीमाल वाहतूक सुलभ झाली असून गावाच्या विकासाला चालना मिळेल. शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने आम्ही आमदार किसन कथोरे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो," अशी प्रतिक्रिया शेतकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या विकासकामांमुळे नडगावातील ग्रामस्थ व शेतकरी वर्गाकडून आमदार किसन कथोरे यांचे आभार मानले जात असून गावाच्या प्रगतीसाठी ही कामे महत्त्वाची ठरत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# निवडणूक बिनविरोध नकोच, मतदान हवेच - सी.आर.म्हात्रे यांची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** निवडणूक बिनविरोध नकोच मतदान हवेच कारण NOTA ( None of the Above) वरीलपैकी कोणीही नाही. म्हणूनच NOTA सह निवडणूक झाली तरच करा विरोध दिसेल अशी मागणी पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केले आहे लोकशाहीत सत्ता मिळविण्याचे एकमेव मार्ग म्हणजे जनतेचे मत.पण आज सर्रास उघडपणे एक धोकादायक खेळी खेळली जाते ती म्हणजे बिनविरोध निवडणूक ही लोकशाहीची परिपक्वता नसून लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न आहे अशी खंतही त्यांनी




व्यक्त केली.

आज सांगितले जाते,एकच उमेदवार आहे,त्यामुळे निवडणूक नको,पण प्रश्न उमेदवाराचा नाही तर तो बहुसंख्य जनतेच्या विरोधाचा.यामध्ये बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराला किती जनतेचा विरोध होता,ही स्पष्ट होईल जनतेचा समाधान होईल. बिनविरोध म्हणजे विरोधच दाबून टाकणं,बिनविरोध निवडणूक म्हणजे मतदानाचा हक्क नाकारणे,विरोधाची शक्यता आधीच संपविणे.आणि सत्तेला प्रश्न विचारणारे आवाज बंद करणे,विरोधच नसेल तर लोकशाही निर्जीव होते असेही त्यांनी सांगितले.

NOTA हे विरोध व्यक्त करणारे शस्त्र होय.एकच उमेदवार असला तरी मतदाराला हा पर्याय हवाच.NOTA म्हणजे अराजक नाही, तो घटनात्मक विरोध आहे. नोटा मधून कळेल की या उमेदवाराला किती मतदारांचा पाठिंबाचे, कितीजणांचा विरोध आहे. लोकप्रियतेची कसोटी मतपेटीच असते.जर उमेदवारावर जनतेचा विश्वास असेल तर मग मतदान टाळण्याची गरज काय,किंवा भीती कशाला,बिनविरोधाचा आग्रक म्हणजे लोकप्रियतेचा विश्वास गमावणे होय कारण मतदानाशिवाय उत्तरदायित्व शून्य,मत न मागता निवडून आलेला लोकप्रतिनिधी जनतेसमोर उत्तरदायी राहत नाही ,कारण त्याला माहीत असतं विरोध व्यक्त करण्याची मतदाराला संधीच दिली नाही. पुढील पाच वर्ष मोजक्यांचे निर्णय असतील आणि ते सर्वांच मान्य करावे लागतील. बिनविरोध हा लोकशाहीचा शॉर्ट कट ,जरी हा सोयीचं वाटत असेल तर उद्या नक्कीच लोकशाहीचा अंत ठरू शकतो. अशी नाराजी ही व्यक्त केली

आज ग्रामपंचायत ,नगरपालिका महानगरपालिका,उद्या विधानसभा,या सर्वच ठिकाणी विरोध संपविला जाईल आणि एकाधिकारशाही जन्माला येईल.

म्हणून एकच उमेदवार बिनविरोध असला तरी निवडणूक झालीच पाहिजे. मतदान झालेच पाहिजे. आणि या विरोधी मतदानाची टक्केवारी जाहीर झाली पाहिजे.जर विरोध व्यक्त करण्याची परवानगी नसेल तर लोकशाही कशाला, बिनविरोध नकोच मतपेटी पाहिजे....तो लोकशाहीचा आत्मा आहे अशी मागणी जनतेच्या वतीने सी.आर. यांनी केली आहे.

# अपक्ष उमेदवार गीतांजली पगार यांच्या प्रचाराला सुरवात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेला सुरवात झाली असून कल्याण मधील प्रभाग क्र. 7 अ सर्वसाधारण महिला गटातून गीतांजली अनंता पगार या अपक्ष निवडणूक लढवत आहेत.

आज रविवार पासून त्यांच्या प्रचाराला सुरवात करण्यात आली. महिलांनी औक्षण करून गीतांजली यांचे जनसंपर्क कार्यलयात स्वागत केले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला वंदन करून पगार यांनी आशीर्वाद घेतले. यानंतर नारळ फोडून फटाके वाजवत ठाणकर पाडा परिसरात प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

गीतांजली पगार यांना निवडणूक आयोगाने शिट्टी निशाणी दिली आहे. रविवार असल्याने जास्तीत जास्त नागरिकांच्या भेटी घेण्यावर त्यांनी भर दिला. तर जनता सुज्ञ असून जनतेच्या पाठिंब्यामुळे आपण अपक्ष निवडणूक लढवत असल्याचे गीतांजली पगार यांनी सांगितले.




# भविष्यवेध



**सोमवार**
**05 जानेवारी 2026**

**मेष**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**वृषभ**
जुनी रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**मिथुन**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**कर्क**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या.

**सिंह**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

**कन्या**
कामाचा ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे.

**तुळ**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**वृश्चिक**
स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**धनु**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**मकर**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल.

**कुंभ**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.

**मिन**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.




# कळव्यात राजकीय समीकरणे बदलली

## उमेदवारी नाकारल्यानंतर प्रमिला केणींना राष्ट्रवादीचा पाठिंबा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** कळवा येथील प्रभाग क्रमांक २३ मध्ये माजी विरोधी पक्ष नेत्या प्रमिला केणी यांना शिंदे सेनेने उमेदवारी नाकारली. यामुळे त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतू, त्यांना या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यांचा प्रचार करण्यासाठी स्वतः जितेंद्र आव्हाड मैदानात उतरले.

ठाणे महापालिका निवडणुकीच्या काही महिने आधी माजी नगरसेवक मिलींद पाटील यांच्यासह सहा ते सात नगरसेवकांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला होता. यामध्ये माजी नगरसेविका प्रमिला केणी आणि त्यांचे पुत्र मंदार केणी यांचाही समावेश होता. कळव्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून प्रमिला केणी आणि त्यांचे दिवंगत पती मुकूंद केणी हे निवडून येत होते. मुकूंद केणी यांच्या निधनानंतर त्यांच्या जागेवर मंदार केणी हे निवडणुक लढण्याची तयारी करीत होते. यामुळे शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडून त्यांना दोन तिकीटे मिळतील अशी आशा होती.

प्रत्यक्षात मंदार केणी यांनाच पक्षाने उमेदवारी दिली तर, प्रमिला केणी यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी शिंदेची सेना प्रयत्न करीत असतानाच, राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाने त्यांना पुरस्कृत केले असून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या उमेदवार दिपा गावंड यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. यामुळे प्रमिला केणी यांना राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. प्रमिला केणी यांचा प्रचार करण्यासाठी आमदार जितेंद्र आव्हाड स्वतः मैदानात उतरले असून जनतेला प्रमिला केणी यांना भरघोस मतदान करा असे आवाहन केले.

# नवी मुंबई महापालिका निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची

## संघटनात्मक ताकद दाखवण्याची संधी – रविंद्र चव्हाण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक ही भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आजवर केलेल्या संघटनात्मक कामाची ताकद दाखवण्याची संधी असून, स्वबळावर लढवली जाणारी ही निवडणूक कार्यकर्त्यांसाठी प्रतिष्ठेची असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. सर्वत्र युती असताना नवी मुंबईत भाजप स्वबळावर निवडणूक लढवत असल्याने ही निवडणूक पक्षासाठी विशेष महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



नवी मुंबईतील पक्ष कार्यालयात आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करत निवडणुकीचे महत्त्व अधोरेखित केले. "आपण इतके दिवस पक्षासाठी जे काम केले, त्याची ताकद दाखवण्याची हीच वेळ आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपली संघटनात्मक क्षमता दाखवून द्यावी," असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

इतर महानगरपालिकांतील कार्यकर्त्यांना जी संधी मिळाली नाही, ती नवी मुंबईतील भाजप कार्यकर्त्यांना मिळाल्याचे सांगत, "ही संधी सोन्याची करा. पूर्ण ताकदीने, क्षमतेने आणि निवडणूक डोक्यावर घेऊन लढा. ही केवळ राजकीय लढत नाही, तर पक्षाच्या प्रतिष्ठेची निवडणूक आहे." या शब्दांत चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना महापालिका निवडणुकीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक अर्ज वाटपावेळी अनेक इच्छुकांना उमेदवारी न मिळाल्याने अनेक कार्यकर्ते नाराज झाले होते. यावेळी उमेदवारी न मिळालेल्या कार्यकर्त्यांना आधार देत, "तुम्ही केलेले काम पक्ष कधीही विसरणार नाही. ज्यांना उमेदवारी मिळाली आहे, त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना विजयी करणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे," अशा शब्दांत संबोधित करताना या काळात जोमाने कामाला लागून आपल्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी काम करण्यासाठी प्रोत्साहित केले.

या मेळाव्यात भाजपच्या नवी मुंबईतील सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा औपचारिक शुभारंभकरण्यात आला. तसेच विविध पक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षसंघटन अधिक मजबूत झाल्याचा दावा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस तसेच शिवसेनेतील (उद्धव ठाकरे गट) काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी माजी खासदार डॉ. संजीव नाईक, मंत्री गणेश नाईक, भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश पाटील यांच्यासह महानगरपालिकेतील उमेदवार, मंडल अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, १२ जानेवारी रोजी मुख्यमंत्री नवी मुंबईत जाहीर सभेसाठी उपस्थित राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# काँग्रेस भाजपा हाणामारी प्रकरण

## भिवंडी पोलिसांकडून 23 जणांविरोधात गुन्हे दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( प्रतिनिधी )** भिवंडी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निमित्त प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून पक्षीय सुडाचे राजकारण सुरू झाले आहे. प्रतिस्पर्धी उमेदवाराला धमकवणे व शिवीगाळ होण्याचे प्रकार होत असून काही ठिकाणी हाणामारीचे भयंकर प्रकार घडू लागले आहे त्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क होऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया करीत आहे.असे असतानाच

शनिवारी सायंकाळी आठ वाजता भिवंडी शहरातील नारपोली भंडारी चौक या ठिकाणी भाजपा व काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्या मध्ये प्रचार रँलीतून घोषणाबाजी झाल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जोरदार दगडफेक हाणामारी शिवीगाळ झाल्याचा गंभीर प्रकार घडला त्यामुळे पोलिसांनी दखल घेऊन या हाणामारी प्रकरणी भोईवाडा व नारपोली पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंनी तक्रार घेऊन दोन वेगवेगळे २३ जणांविरोधात गुन्हा दाखल केले आहेत. मात्र अद्याप कोणाला ही अटक केली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपा उमेदवार यशवंत टावरे यांनी नारपोली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल,राज यादव,धर्मेंद्र पाल,राहुल पाल, अश्विनी वर्मा उर्फ मल्लू,गोपी वर्मा, लक्की जयस्वाल,नूर अली चायनीजवाला,लखन राठोड,रोहित यादव उर्फ लेंडी,विकी वर्मा,यश पाटील व इतर ३० ते ३५ अज्ञात व्यक्ती विरोधात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांनी भोईवाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नंतर यशवंत टावरे,रुपम टावरे,योगेश टावरे, रितेश टावरे,भरत टावरे,किरण माने,राजा इंदुरकर,विक्की बिल्लारे,राहुल जाधव,जसवंत गुप्ता,नितेश जाधव व इतर ४ ते ५ अनोळखी व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. चौकशीत आढळून आले आहे की काँग्रेस उमेदवारांनी काढलेली प्रचार रॅली ही विनापरवाना होती तसेच तर काँग्रेस उमेदवाराचे कार्यालय सुद्धा विना परवाना सुरू केले होते.या बाबत निवडणूक निर्णय अधिकारी ५ यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकातील कर्मचारी संदीप चव्हाण यांनी भोईवाडा पोलिस ठाण्यात आचारसंहिता उल्लंघन केल्या प्रकरणी काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

निवडणुकीचे पार्श्वभूमीवर भिवंडी पोलिसांनी शहरातील विविध भागात रात्री व दिवसा गस्त घालून बंदोबस्त तैनात करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहे. तसेच रात्रीच्या वेळी उशिरापर्यंत चालणारे हॉटेल,चायनीज व पावभाजी विक्री हातगाड्यावर गर्दी होत आहे व इतर उद्योग व्यवसाय हे बंद करावे अशीही मागणी होत आहे.

# बंडखोरी आणि पक्षविरोधी काम करणाऱ्यांचा शिवसेना-भाजप पक्षश्रेष्ठी निर्णय घेणार

**- शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील महायुतीतील 55 ते 60 जणांची यादी तयार**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवलीत महायुतीतील शिवसेना शिंदे गट-भाजप एकत्र निवडणूक लढत आहेत. निवडणुकीत अनेक जण इच्छुक होते. त्यामध्ये बहुतांश इच्छूकांना शिवसेना भाजपा नेत्यांनी अर्ज मागे घ्यायला लावला. परंतु अद्याप काही बंडखोर आहेत. त्यांनी त्यांची उमेदवारी मागे घेतली नाही. त्यासोबतच असेही काही लोक आहेत जे पक्षात राहून पक्षविरोधी काम करीत आहेत अशा लोकांची एक यादी तयार करून शिवसेना-भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना पाठवण्यात आली आहे. काही तासात त्यांच्यावर पक्षश्रेष्ठी निर्णय घेईल असे विधान शिवसेना शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांनी केले आहे. शिवसेना भाजपामध्ये कल्याण डोंबिवलीत 55 ते 60 लोक असे आहेत जे बंडखोरी करून निवडणूक लढत आहे आणि यातील काही लोक पक्षविरोधी काम करत आहेत. यामुळे बंडखोरी आणि पक्षविरोधी काम करणाऱ्यांवर दोन्ही पक्ष कडक कारवाई करणार हे निश्चित मानले जात आहे.

# बिनविरोध निवडीनंतर ठाण्यात आरोप–प्रत्यारोप

**ठाकरेंच्या उमेदवाराला घेऊन पोलीस कर्मचारी शिंदेंच्या बंगल्यावर ?**
**व्हिडीओ दाखवत अविनाश जाधव यांचा गंभीर आरोप**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(बातमीदार)**

**ठाणे :** ठाण्यात शिंदे गटाचे काही नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यानंतर आता ठाकरे गट आणि मनसेकडून भाजप शिंदे गटावर गंभीर आरोप केले जात आहे. एक पोलीस कर्मचारी आमच्या उमेदवाराला घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थांनी नेत असल्याचा गंभीर आरोप मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी केला. तसेच त्याचे व्हिडीओ पत्रकार परिषदेत दाखविले. त्यामुळे ठाण्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.



ठाणे महापालिकेत शिवसेना (ठाकरे गट), मनसे आणि राष्ट्रवादीची (शरद पवार गट) आघाडी आहे. ठाण्यातील शिंदे गटाचे काही उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर रविवारी ठाकरे गटाचे नेते राजन विचारे, मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप आणि शिंदे गटावर टीका केली.

ठाण्यात नितीन कंपनी परिसरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान आहे. या निवासस्थानाबाहेरील एक चित्रीकरण अविनाश जाधव यांनी माध्यमांसमोर सादर केले. यामध्ये ठाकरे गटाचे उमेदवार विक्रांत घाग यांना एक पोलीस कर्मचारी एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी घेऊन जात असल्याचा दावा अविनाश जाधव यांनी केला. या उमेदवाराला शिवसेनेकडून (ठाकरे गट) उमेदवारी मिळाली होती. असे असतानाही त्यांना एकनाथ शिंदे यांच्या निवावस्थानी का नेले जात होते, याची चौकशी व्हायला हवी अशी मागणी अविनाश जाधव यांनी केली. ही निवडणूक पैशांनी आणि पोलीस दबावाखाली घेतली जात आहेत असा आरोपही त्यांनी केला.

### बिनविरोधसाठी अधिकारी, पैशांचा वापर

**निवडणूक अधिकारी बदलले नाही ; तर रस्त्यावर**

ठाण्यातील दोन निवडणूक अधिकारी येत्या दोन दिवसांत बदलले नाही. तर आम्ही त्याचा तीव्र विरोध करुन रस्त्यावर उतरू असा इशारा अविनाश जाधव यांनी दिला आहे. निर्णय मिळत नाही तो पर्यंत आम्ही थांबणार नाही असेही ते म्हणाले. आमचे अर्ज बाद करण्याचे अर्धे काम अधिकाऱ्यांनी, पोलिसांनी आणि अर्धे काम पैशांनी करण्यात आल्याचा आरोप ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांनी केला. महापालिकेत लुटालूट सुरु आहे. ठाणे शहर वाचवायचे असेल तर जनतेने विचार करून यांना खाली आणले पाहिजे. जनतेने मतदान करुन या दरोडेखोरांना घरी बसवा असेही विचारे म्हणाले.



# महायुती असूनही चार जागांवर शिवसेना भाजप आमने-सामने

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(बातमीदार)**

**वसई :-** वसई विरार महापालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांची चढाओढ सुरू आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात महायुतीची घोषणा झाली आहे. यात जागा वाटपाच्या ठरलेल्या फॉरमूल्यानंतरही भाजपने दोन प्रभागातील चार जागांवर शिवसेना शिंदे गट यांच्या विरोधात उमेदवार उभे करण्यात आले आहे. त्यामुळे कुठे तरी युती धर्म पाळला गेला नसल्याची चर्चा ही सुरू झाली आहे.

येत्या १५ जानेवारीला ११५ जागांसाठी वसई विरार महापालिकेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष सज्ज झाले आहे. विशेषतः यापूर्वी महापालिकेत सत्तेत असलेल्या हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीला शह देण्यासाठी शिवसेना शिंदे गट व भाजप यांनी एकत्रित येत महायुती केली आहे. सुरुवातीला दोन्ही पक्षात जागा वाटपावरून कलगीतुरा रंगला होता. मात्र वरिष्ठांच्या चर्चेनंतर जागा वाटपाचा तिढा सुटला होता. यात २९ प्रभागात ११५ जागांमध्ये भाजप ८८ तर शिवसेना शिंदे गट २७ जागा लढणार असल्याचे निश्चित झाले आहे. मात्र त्यातच आता शिवसेना शिंदे गट यांच्या सोडलेल्या दोन ठिकाणच्या प्रभागात भाजपने ने एबी अर्ज देऊन आपले उमेदवार उभे केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेना आणि भाजप यांच्यातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे चित्र दिसून येत आहे. एकीकडे अन्य प्रभागात महायुतीत लढणारी भाजपा व शिवसेना या दोन प्रभागात मात्र आमने-सामने उभे ठाकले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

२७ जागा शिवसेना शिंदे गट यांना सोडल्या होत्या. त्यात प्रभाग क्रमांक ९ ब आणि १६ अ, १६ ब, १६ क यांचा समावेश होता.

मात्र ९ ब मधून सेनेने अपर्णा अजित खांबे यांना उमेदवारी दिली आहे तर त्याच प्रभागात भाजपने सुमन कल्पनाथ सिंह यांना उमेदवारी दिली आहे, तर दुसरीकडे प्रभाग क्रमांक १६

अ मध्ये स्वप्नील अविनाश बांदेकर याच्या विरोधात भाजपने निलेश रमेश चौधरी, १६ ब मध्ये सेनेच्या स्नेहल जितेंद्र शिंदे यांच्या विरोधात मिरा निकम यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. तर १६ क मध्ये भाविका प्रशांत टेलर यांना उमेदवारी दिली असून त्यांच्या समोर भाजपने बंटी तिवारी यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे दोन्ही पक्षात असलेला अंतर्गत गोंधळ यामुळे समोर आला आहे.

# अर्ज माघारीमुळे पनवेलमध्ये सात उमेदवार बिनविरोध

## बिनविरोध निवडीवर विरोधकांचे गंभीर आरोप : राजकारण तापले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल:** पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याआधीच भाजपने राजकीय रणांगणात निर्णायक आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. शहरातील सात जागांवर उमदेवारांनी अर्ज माघारी घेतल्यामुळे शिल्लक एकमेव उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांच्या विजयाची केवळ औपचारिक घोषणा होणे बाकी आहे. यापैकी सहा उमेदवार भाजपचे तर एक अपक्ष उमेदवार भाजप आमदाराची बहीण आहे. ही माघार पूर्वनियोजित आणि काटेकोरपणे राबवलेल्या रणनितीचा भाग असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे.

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत ३४३ उमेदवारी अर्ज वैध ठरल्यानंतर शुक्रवारी दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज माघारी घेण्याची मुदत होती. या कालावधीत तब्बल ८८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. परिणामी आता अंतिम लढत २५५ जागांपुरतीच मर्यादित राहिली आहे. प्रभाग क्रमांक १८, १९ आणि २० या तीन प्रभागांतील ११ जागांपैकी सात जागांवर दुरंगी लढत अपेक्षित असताना, स्पर्धक उमेदवारांनी गुरुवारपासून ते शुक्रवारी दुपारपर्यंत अचानक माघार घेतली. त्यामुळे या सात जागांवर पनवेलकरांना राजकीय पक्षांनी ठरवलेल्या उमेदवारालाच यापुढे पाच वर्षे नगरसेवक मानावे लागणार आहे.

या साऱ्या घडामोडींमुळे प्रभाग क्रमांक १८ अ, १८ ब, १८ क, १९ अ, १९ ब, २० अ आणि २० बया सात जागांवर पनवेलकरांना मतदान करण्याची गरजच उरलेली नाही. याबाबत अधिकृत घोषणा निवडणूक अधिकाऱ्यांनी केली नसली पनवेल महापालिकेने प्रभाग समिती निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्रमांक ६ मधून सात उमेदवार बिनविरोध असल्याची माहिती देण्यात आली.

**■ रणनिती पूर्वनियोजित?**

एकूण ७८ जागांसाठी ३४३ अर्ज प्राप्त झाल्याने १६ दुरंगी आणि २० तिरंगी लढती अपेक्षित होत्या. मात्र 'मिशन कमळ'ची आखणी इतकी प्रभावी ठरली की विरोधकांच्या नाकाखालून उमेदवार पळवले गेले आणि त्याची जाणीव विरोधकांना शुक्रवारी अर्ज माघारीच्या बातम्या पसरल्यानंतरच झाली. ही संपूर्ण रणनिती पूर्वनियोजित असल्याचे बोलले जात असून, गुरुवारपासून सुरू झालेला हा खेळ शुक्रवारी दुपारपर्यंत पूर्ण करण्यात आला.

### अपक्ष उमेदवाराचा विजय, भाजपची माघार

प्रभाग क्रमांक १८ क मधील उमेदवार अपक्ष स्नेहल ढमाले भाजप आमदार विक्रांत पाटील यांच्या बहीण असल्याने या 'अपक्ष' उमेदवारीवरही प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रभागात भाजपसह इतर अपक्ष उमेदवारांनीही अर्ज माघारी घेतल्याने या अपक्ष उमेदवारालाच थेट लाभ झाला. भविष्यात ढमाले यांचा भाजपमध्ये प्रवेश झाल्यास याबाबत नवल नसल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

# मतदानाबाबत दिवा परिसरात प्रतिज्ञा व प्रभात फेरीच्या माध्यमातून जनजागृती



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे (04): मतदानाचा टक्का वाढविण्याच्या दृष्टीने तसेच लोकशाहीचा अधिकार प्रत्येक नागरिकाने बजावावा, या उद्देशाने ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक 27 व 28 येथे शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रभावी मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात स्वीप उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात मतदानाबाबत जनजागृती मोहिम आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या मार्गदर्शनानुसार स्वीप उपक्रमाच्या नोडल अधिकारी डॉ. मिताली संचेती यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

दिवा स्टेशन (पूर्व) येथील एस. एम. ग. विद्यालय येथे मतदान जनजागृती प्रतिज्ञा व प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभातफेरीत विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन “मतदान हा हक्क आणि कर्तव्य आहे”, “लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करूया” अशा घोषणा देत नागरिकांमध्ये जनजागृती केली. या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक धादवे सर, सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच स्वीप पथक प्रमुख सचिन विलास वायदंडे (पथक क्र. 27 व 28) यांच्या नेतृत्वाखाली मच्छिंद्र साहेबराव मुंडे, गिरीश शेलार (केंद्र समन्वयक – 15), शिवा सांगळे, निवृत्ती जाधव व स्वीप पथकातील सदस्य उपस्थित होते. या जनजागृती उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला असून, आगामी निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26



११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111



ठाणे ■ सोमवार
05 जानेवारी 2026
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# पालिका म्हणजे 'अलिबाबाची गुहा' ठरू नये! : स्कूलबसवरील फलकांनं राजकारण्यांची बोलती बंद !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण - महापालिका म्हणजे अलिबाबाची गुहा. एकदा पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून गेले की पालिकेचे आपणच वतनदार, सरंजामदार अशा पध्दतीने काही नगरसेवक वावरतात. त्यामुळे आपण कोण, कसा उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून देतो यावर शहराचे भवितव्य आहे. मागील २५ वर्षात आपण कसे नगरसेवक निवडून दिले. त्यांनी शहरात किती विकासाचे दिवे लावले याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा उकिरडा झालेली कल्याण डोंबिवली शहरे भकास झाल्या शिवाय राहणार नाहीत, असा कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीच्या तोंडावर जनजागृती करणारा एक संदेश डोंबिवलीतील उपक्रमशील विद्यानिकेतन शाळेच्या बसवर झळकविला गेला आहे. मागील दोन वर्षाच्या कालावधीत विद्यानिकेतन शाळेने जागल्याची भूमिका बजावत शाळेच्या बसवर लोकांचे डोळे लख्ख उघडणारे फलक लावून जनजागृती केली आहे. आता महापालिका निवडणुकांच वारे वाहत आहेत. कल्याण डोंबिवली शहरांमधील वाहतूक कोंडी, नागरी समस्यांचा उडालेला बोजवरा, यामुळे कॉंक्रीटच्या रस्त्यांची होत असलेली धूळधाण, सत्तेसाठी कसलेही भय, लज्जा न बाळगता सुरू असलेल्या हालचाली, लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून उधळवला जात असलेला गुलाल. ही परिस्थिती कोणी आणली, असा प्रश्न फलकावरील मार्मिक शब्दातून करण्यात आला आहे.




# स्पोर्ट्स बाईकस्वारांचा धिंगाणा
## रहिवाशांच्या तक्रारीनंतर पोलीस गस्त सक्रिय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - डोंबिवली जवळील शिळफाटा रस्त्यावरील गोळवली गाव हद्दीतील रिजन्सी अनंतम गृहसंकुलाच्या विको नाका ते रिजन्सी अनंतम आतील भागात मागील काही महिन्यांपासून कर्णकर्कश आवाज करत, सुसाट वेगाने दुचाकी चालविणारे स्पोर्ट्स बाईकस्वार यांनी मध्यरात्रीच्या सुमारास धिंगाणा घातला आहे. या दुचाकीस्वारांच्या उपद्रवामुळे रिजन्सी अनंतम गृहसंकुलातील रहिवासी त्रस्त आहेत. अखेर या रस्त्यावर पाच दिवसापूर्वी एका स्पोट्र्स बाईकस्वाराचा वेगाने दुचाकी चालविताना अपघात झाला. यामुळे जागरूक झालेल्या रहिवाशांनी अखेर मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी तातडीने रात्रीच्या वेळेत रिजन्सी अनंतमच्या आतील रस्त्यावर रात्रीची गस्त सुरू केली आहे.

कल्याण, डोंबिवली शहरात लाखो रूपये किमतीच्या स्पोर्ट्स बाईक घेऊन त्या चालविणारे पट्टीचे दुचाकीस्वार आहेत. हे दुचाकीस्वार यापूर्वी डोंबिवलीतील माणकोली उड्डाण पूल, ठाकुर्ली खंबाळपाडा येथील ९० फुटी रस्ता, कल्याण पूर्वेतील १०० फुटी रस्ता, शिळफाटा रस्त्या लगतच्या प्रशस्त रस्त्यावर रात्री १२ ते पहाटे चार वाजण्याच्या दरम्यान चित्तथरारक कसरती करत, कर्णकर्कश आवाज करत दुचाकी चालवित होते. या दुचाकींमुळे झोपमोड होते म्हणून रहिवासी पोलीस ठाण्यात तक्रारी करत होते. पोलिसांनी प्राप्त तक्रारींप्रमाणे विविध रस्त्यावर दुचाकी चालविणाऱ्या या दुचाकीस्वारांवर कारवाई केली. त्यामुळे या दुचाकीस्वारांनी मागील काही महिन्यांपासून डोंबिवली जवळील गोळवली येथील विको नाका ते रिजन्सी अनंतम या १०० फुटी प्रशस्त रस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास चित्तथरारक कृती, कर्णकर्कश आवाज करत दुचाकी चालविण्यास सुरूवात केली होती. या आवाजाने झोपमोड होत असल्याने रिजन्सी अनंतम गृहसंकुलातील रहिवासी त्रस्त होते.

दोन दिवसापूर्वी रिजन्सी अनंतम रस्त्यावर एक स्पोर्ट्स बाईक स्वार मध्यरात्री थरारक कसरती करत असताना दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकीसह ३० ते ४० फूट रस्त्यावरून फरफटत गेला. या अपघातानंतर हा नेहमीचा त्रास सहन केलेले रिजन्सी अनंतममधील रहिवासी जागृत झाले. त्यांनी हा प्रकार कोठेतरी थांबविला पाहिजे म्हणून मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्याकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला.

# अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये
## – पालघर पोलिसांचे पालकांना आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**सफाळा** : सफाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे कळकळीचे आवाहन पालक व शैक्षणिक संस्थांना केले आहे. सफाळा पोलीस ठाणे हद्दीत १८ वर्षांखालील विद्यार्थी वाहन चालवत असल्याचे आढळून आले असून ही बाब अत्यंत धोकादायक व कायद्याने बेकायदेशीर आहे. अल्पवयीन मुलांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यासाठी थेट पालकांना जबाबदार धरले जाणार असून मोटार वाहन कायदा व भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. अशा प्रकरणांमध्ये रु. 25,000 दंड, 3 वर्षांपर्यंत कारावास, वाहन नोंदणी रद्द होणे तसेच भविष्यात परवाना, नोकरी व पासपोर्ट मिळण्यात अडचणी येऊ शकतात. पालकांनी अल्पवयीन मुलांच्या ताब्यात कोणतेही वाहन देऊ नये व शाळांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे
# मतदान जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमांचे आयोजन !



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या जनजागृतीसाठी महानगरपालिकेने अनेक स्वीप उपक्रमांचे आयोजन महापालिका परिक्षेत्रात केले आहे. जनमानसात मतदानाबाबत अधिकाधिक जनजागृती व्हावी या दृष्टीकोनातून काल कल्याण पश्चिम येथील नागरिकांचा जास्त वावर असलेल्या सिटी पार्क मध्ये विविध ठिकाणी तसेच वसार ,भाल बस थांबा परिसर, चक्कीनाका परिसर येथे जे.सी.एस मराठी हायस्कुल, प्रगती विदयामंदिर प्राथमिक शाळा यांच्या विदयार्थ्यांमार्फत जनजागृतीपर पथनाटयांचे आयोजन करण्यात आले. यावेळी कल्याण डोंबिवली महागनरपालिकेचे स्वीपचे नोडल अधिकारी संजय जाधव, सहा.नोडल अधिकारी विजय सरकटे, जे.सी. एस शाळेचे मुख्याध्यापक गणेश कोळेकर सर व प्रगती विदयामंदिर प्राथमिकचे मुख्याध्यापक संतोष माने तसेच इतर सह शिक्षक उपस्थित होते.

इतकेच नव्हे तर महापालिकेच्या विविध शाळांमध्ये आकर्षक रंग रांगोळीच्या माध्यमातून, फुलांच्या माध्यमातून तसेच हातांवर रेखाटलेल्या मेंदीच्या माध्यमातून अनोख्या पध्दतीने मतदानाची जनजागृती करण्यात आली

# बोर्डी गावातील रस्ता धोकादायक
## चिन्हे, फलक व गतिरोधक उभारण्याची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर:** पर्यटकांचा मोठा ओढा असणाऱ्या बोर्डी गावातील मुख्य रस्त्यावर वेगाने जाणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसल्याने तसेच समुद्रकिनारी अथवा न्याहारी निवास व्यवस्था असणाऱ्या ठिकाणी दिशा दर्शवणारे चिन्ह फलक नसल्याने अपघात घडत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर गतिरोधक व रंबलर उभारणी करण्याची मागणी ग्रामपंचायत यांनी केली आहे. बोर्डी येथील अमृतवाडी परिसरात पंधरवड्या पूर्वी एका पर्यटकाच्या चुकीमुळे बोर्डी मधील एका तरुणाचा अपघाती मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर गावामध्ये मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. बाहेर गावाहून येणाऱ्या पर्यटकांना समुद्रकिनारी जाण्याचे मार्ग निदेर्शित नसल्याने अचानकपणे वळण घेणे, वाहन थांबवणे असे प्रकार घडत असून त्यामुळे पाठीमागून येणारा वाहन चालक बेसावध असल्यास अपघात होताना दिसून आले आहेत. डहाणू, नरपड, बोर्डी परिसरातील अनेक नागरिक व विशेषतः महिला या तलासरी - उंबरगाव तसेच गुजरात राज्यातील उद्योगांमध्ये कामाला जातात. या कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यासाठी लहान मोठी वाहन कार्यरत असून दररोज सकाळी व सायंकाळी किमान ५०० वाहन या मार्गावरून प्रवास करत असल्याचे दिसून आले आहे. ही वाहने मोठ्या वेगाने व एकमेकांना ओव्हरटेक करण्याच्या चढाओढ करण्याच्या प्रयत्नात असल्याने अपघात होत असून त्यांच्या प्रवासाच्या प्रसंगी या भागात पोलीस नसल्याने त्यावर नियंत्रण राखणे कठीण झाले आहे. या प्रयत्नात अनेकदा अपघात होत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.



### बिग बॉस मराठी उपविजेत्या
# जय दुधानेला मालमत्ता फसवणूक प्रकरणी अटक
## गाळे विक्रीच्या नावाखाली कोट्यवधींचा गंडा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : बिग बॉस मराठी या मालिकेतून प्रसिद्धी झोतात आलेल्या जय दुधाने याला ४ कोटी ६१ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणी वर्तकनगर पोलिसांनी मुंबई विमानतळावरून अटक केली आहे. ठाण्यातील त्याचे दुकाने बँकेकडे तारण असतानाही त्याने ते विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. जय दुधाने याच्या अटकेमुळे बॉलिवूडमध्ये खळबळ उडाली आहे.

ठाण्यातील पोखरण रोड क्रमांक एक भागात जय दुधाने हा त्याच्या कुटुंबियासोबत वास्तव्यास आहे. जय दुधाने हा एम टीव्ही स्प्लिट्सविला १३ चा विजेता होता. तसेच मराठी बिग बॉस या मालिकेतील तिसऱ्या पर्वाचा उप विजेता होता. मराठी बिग बॉसमध्ये त्याला मोठ्याप्रमाणात लोकप्रियता मिळाली. त्याचे इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर फॉलोवर्स देखील वाढले होते.

जय दुधाने याच्या कुटुंबियांचे काही गाळे पोखरणरोड क्रमांक एक भागात आहेत. हे गाळे एका खासगी बँकेकडे तारण आहेत. असे असतानाही त्यांनी हे गाळे त्याच भागात राहणाऱ्या एका व्यक्तीला विक्री करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्या गाळयांच्या मोबदल्यात जय दुधाने आणि त्यांच्या कुटुंबियांनी तक्रारदार यांच्याकडून टप्प्याटप्प्याने ४ कोटी ६१ लाख रुपये घेतले होते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदार यांनी याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर वर्तकनगर पोलिसांनी जय दुधाने याला विमानतळावरून अटक केली.

# उरणमधील शेती नष्ट करण्याचा डाव?
## खारलँडच्या विभागाच्या दुर्लक्षाने शेकडो हेक्टर शेतीत समुद्राचे खारे पाणी

**उरण हे कधीकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखले जायचे. मात्र औद्योगिकीकरणाच्या आड लपून खारलँड विभागाच्या दुर्लक्षामुळे समुद्राचे पाणी शेतजमिनीत घुसत असून उरणची शेती जाणीवपूर्वक नष्ट केली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकरी कार्यकर्ते संजय ठाकूर यांनी केला आहे.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उरण** : किनारपट्टीवरील शेतीचे समुद्राच्या भरतीपासून संरक्षण करण्यासाठी केलेले बांध कमकुवत झाल्याने भात शेतीत पाणी शिरण्याचे प्रकार वारंवार सुरू आहेत. या नादुरुस्त बांधांना भेगा पडल्या आहेत. याकडे शासनाच्या खारलँड विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने जमिनी नापिकी होण्याचा धोका वाढला आहे. उरणमधील दोन हजार हेक्टर जमिनीला फटका बसणार असून जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या उरणमध्ये हजारो एकर जमिनी केंद्र व राज्य सरकारच्या औद्योगिक प्रकल्प, बंदर आणि खासगी उद्योगासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतजमिनी कमी झाल्या आहेत. असे असले तरी उरणच्या नागाव, केगाव व चाणजे तसेच उरण पूर्व विभागातील खोपटे, कोप्रोली, चिरनेर, आवरे, गोवठाणे, वशेणी, पुनाडे, धुतुम, बोरखार, मोठीजुई आदी खाडी किनारची जमीन भात पिकाखाली आहे.

मात्र या जमिनीच्या परिसरात येणाऱ्या समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी असलेल्या नैसर्गिक वाटा बुजविण्यात येत आहेत. त्यामुळे शेतीच्या सुरक्षेसाठी बांधण्यात आलेले बांध फुटून भात शेतीत पाणी शिरत आहे. यात खोपटे, मोठीजुई, बोरखार परिसराला मोठा फटका बसत आहे. या जमिनीचे समुद्राच्या भरतीच्या पासून संरक्षण करण्याची जबाबदारी खारलँड विभागाची आहे. उरण तालुका हा खारलँड विभागाच्या पेण परिक्षेत्रात मोडतो. त्यामुळे या समस्येकडे दुर्लक्ष होत आहे.

# अंबरनाथ शहरातील भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी अधिक प्रभावी उपाययोजनांची गरज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषदेच्या वतीने भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत असल्या तरी शहरातील भटक्या श्वानांची संख्या अद्याप अपेक्षित प्रमाणात कमी झालेली नाही. याचा थेट परिणाम नागरिकांच्या सुरक्षिततेवर होत असून, मागील एका वर्षात ७ हजार ५९३ नागरिकांना भटक्या कुत्र्यांच्या चाव्याच्या घटना घडल्याची नोंद नगरपालिकेच्या आकडेवारीत आहे. या घटनांमध्ये किरकोळ नखे लागण्यापासून ते गंभीर चाव्याच्या प्रकारांचा समावेश असून, दोन महिन्यांपूर्वी रेबीजमुळे एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना शहरासाठी गंभीर इशारा मानली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षेच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नाकडे अधिक प्रभावीपणे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

अंबरनाथ शहरात सध्या अंदाजे आठ हजारांहून अधिक भटके श्वान असल्याचा अंदाज नगरपालिकेच्या आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने श्वान निर्बीजीकरण केंद्र सुरू करून सकारात्मक पाऊल उचलले आहे. मात्र, या केंद्राच्या कार्यक्षमतेत अधिक वाढ करून निर्बीजीकरणाची गती वाढवणे, लसीकरण मोहीम व्यापक करणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# स्वच्छ सर्वेक्षण मोहिमे अंतर्गत ठाणे स्थानक परिसरात 'डीप क्लीन ड्राईव्ह'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (04)** : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने रेल्वे स्थानक परिसरात भव्य 'डीप क्लीन ड्राइव्ह' घेण्यात आला. आगामी स्वच्छ सर्वेक्षणच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. शुक्रवारी रात्री राबविण्यात आल्यामुळे शनिवारी पहाटे रेल्वेस्थानकामध्ये प्रवेश केलेल्या प्रवाशांनी परिसर स्वच्छतेबाबत ठाणे महापालिकेचे कौतुक केले.



शुक्रवारी रात्री ठाणे स्थानक परिसर, सॅटीस पुलासह संपूर्ण परिसर पाण्याने स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे कोपरी येथील एसटीपी (STP) प्रकल्पातील प्रक्रिया केलेले व पुर्नवापरासाठी योग्य असलेल्या पाण्याचा वापर करण्यात आला असल्याचे उपायुक्त मधुकर बोडके यांनी नमूद केले. या महास्वच्छता मोहिमेत ठाणे महानगरपालिका प्रशासनासह टीएमटी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग, वाहतूक पोलीस, रेल्वे प्रशासन, पाणीपुरवठा, उद्यान तसेच शिक्षण विभाग अशा विविध यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सुमारे ३०० ते ३५० कर्मचारी मध्यरात्रीपर्यंत अथक परिश्रम घेत परिसर स्वच्छ करत होते. या मोहिमेदरम्यान वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट, टीएमटी व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, तसेच पंजाबराव कवळे, स्वच्छता निरिक्षक लक्ष्मण पुरी हे सुध्दा प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी स्वच्छतेची शपथ घेत आपले ठाणे शहर स्वच्छ,सुंदर ठेवण्याचा निर्धार करण्यात आला.

या 'डीप क्लीन ड्राइव्ह'मुळे स्थानक परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित व नागरिकांसाठी सुकर झाला आहे. यावेळी स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक ठाणेकराचे कर्तव्य आहे, असे आवाहन यावेळी महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# अभाविपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार अशोक मोडक यांचं निधन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष तसेच कोकण पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार डॉ. अशोक मोडक यांचे शुक्रवारी मुंबईत निधन झाले. ते ८५ वर्षाचे होते. त्यांनी १०४ शोध निबंध आणि ४० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. डोंबिवलीकर असलेले डॉ. मोडक हे काही वर्षांपासून मुंबईतील पवई येथे राहत होते. त्यांना हिरानंदानी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २ जानेवारीला रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर आज दि.3 रोजी पवई स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भाजप, अभाविप, शिक्षणक्षेत्र, साहित्य क्षेत्र आणि सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी श्रद्धांजली वाहिली.




### केडीएमसी शिक्षण विभागामार्फत
# अस्थिव्यंग दिव्यांग विदयार्थ्यांसाठी प्राथमिक तपासणीचे आयोजन !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण उपक्रमातंर्गत अस्थिव्यंग/दिव्यांग विदयार्थ्यांसाठी ऑर्थोपेडिक कॅम्पचे आयोजन दि.07/01/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता बाई रुक्मिणीबाई रुग्णालय कल्याण पश्चिम येथे करण्यात आले आहे. तरी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा, महाविदयालय यांचे मुख्याध्यापक शिक्षक/विशेष शिक्षक,पालक यांनी आपापल्या संपर्कातील, शाळांमधील, शाळाबाहय अस्थिव्यंग व बहुविकलांग असलेल्या दिव्यांग विदयार्थ्यांना त्यांची तपासणी करुन प्रमाणपत्रे व युटीआयडी कार्ड काढण्यासाठी 7 जानेवारी रोजी सकाळी 10.00 वाजता बाई रुक्मिणीबाई रुग्णालयात हजर राहणेबाबत कळवावे. तसेच अधिक माहितीसाठी समग्र शिक्षण विभागाचे समन्वयक घोडे सर यांच्याशी 9423757280/8655590880 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.

### भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी
# नाईक कुटूंबाची सून मैदानात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी प्रचाराचा नारळ फोडला आहे. नवीमुंबईत देखील प्रचार सुरु झाला असून नवीमुंबईत भाजप शिवसेना वेगवेगळे लढत आहेत. नवी मुंबईत भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी नाईक कुटूंबाची सून यंदा मैदानात उतरल्या आहेत. महापालिकांच्या निवडणूकीत काही भागात शिवसेना भाजपा यूती झाली असली तरी, नवी मुंबईत मात्र या दोन पक्षांची युती झालेली नाही. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. नवीमुंबईत भाजपच्या उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली असून त्यांच्या प्रचाराला वनमंत्री गणेश नाईक यांची सून स्वतः मैदानात उतरल्याचे दिसून येत आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024